RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

रविवार, २५ जानेवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : ३० | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 25 January 2026 | Year : 6 | Issue : 30 | Daily | Rate: Rs. 5/-

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

संपर्क
ॲड . सुशीला
मो नं 8766507294

दि. 24 जानेवारी 2026



1939 स्वतंत्र मजूर पक्षाची सोलापूर येथे सभा.

1942 नागपूर येथे गांधीजींना काळी निशाणे दाखवून कार्यकर्त्यांनी आपला विरोध दर्शविला.

संकलन प्रा. यशवंत दुपटे



# टायगर स्टेट'मध्ये वाघ का मरत आहेत ?

## उच्च न्यायालयाची केंद्र, राज्य सरकारसह 'एनटीसीए'ला नोटीस

**नागपूर :** मध्य प्रदेशात वाघांच्या मृत्यूत चिंताजनक वाढ झाल्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त करत मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने केंद्र व राज्य सरकारांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणी त्यांची भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

वन्यजीव कार्यकर्ते अजय दुबे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू होती. याचिकेनुसार, 2025 मध्ये मध्य प्रदेशात एकूण 54 वाघांचा मृत्यू झाला असून, 'प्रोजेक्ट टायगर' सुरू झाल्यापासून एका वर्षातील ही सर्वाधिक वाघ मृत्यूची संख्या आहे. यापैकी निम्म्याहून अधिक मृत्यू हे अनैसर्गिक कारणांमुळे झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मुख्य न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि न्यायमूर्ती विनय सराफ यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत केंद्र व राज्य सरकारांच्या वन आणि पर्यावरण विभागांसह राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला (एनटीसीए) नोटीस पाठवली आहे.

याचिकेनुसार, जगात सध्या एकूण 5,421 वाघ असून त्यापैकी 3,167 वाघ भारतात आहेत. भारतातील सुमारे 25 टक्के म्हणजेच 785 वाघ मध्य प्रदेशात आहेत. 'टायगर स्टेट' म्हणून ओळख असूनही 2025 मध्ये राज्यात 54 वाघांचा मृत्यू झाला. यापूर्वी 2022 मध्ये 43, 2023 मध्ये 45 आणि 2024 मध्ये 46 वाघांचा मृत्यू झाल्याचे आकडे याचिकेत नमूद आहेत. या मृत्यूंपैकी सुमारे 57 टक्के मृत्यू हे मानव-वन्यजीव संघर्ष, वीजेचा धक्का (इलेक्ट्रोक्युशन) किंवा इतर अज्ञात अनैसर्गिक कारणांमुळे झाल्याचा दावा करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील आदित्य सांघी आणि अलका सिंग यांनी न्यायालयात बाजू मांडली. याच वेळी, वाघांच्या शिकारीसंदर्भातील दुसऱ्या याचिकेत न्यायालयाने आदित्य सांघी यांची 'ॲमिकस क्युरी' म्हणून नियुक्ती केली. दोन्ही याचिकांवर एकत्रित सुनावणी करण्यात येणार आहे. मध्यप्रदेश नंतर वाघांची सर्वाधिक मृत्यूसंख्या महाराष्ट्र या राज्यात आहे.

यंदा जानेवारीच्या पहिल्या काही दिवसातच राज्यात चार वाघ मृत्युमुखी पडले. 2025 मध्येही पहिल्याच महिन्यात अवघ्या 22 दिवसात 11 वाघ मृत्युमुखी पडले होते. वाघ मृत्यूंच्याबाबत राज्य देशात दुसऱ्या स्थानावर आले आहे. याबाबत 'लोकसत्ता'मध्ये प्रकाशित बातमीच्या आधारावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वतःहून जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले. जानेवारीच्या पहिल्या बारा दिवसात चार वाघ मृत्युमुखी पडल्याबाबत लोकसत्ताने 13 जानेवारीच्या अंकात वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताच्या आधारावर उच्च न्यायालयाने गुरुवारी जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने याप्रकरणी ?ड.चैतन्य ध्रुव यांची न्यायालयीन मित्र म्हणून नियुक्ती करत रीतसर याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले. राज्यात मानव-वन्यजीव संघर्ष गंभीर झाला आहे. वाघाच्या हल्ल्यात मानवी मृत्यूची संख्या वाढत असतानाच वाघांच्या मृत्यूची संख्याही वाढत आहे. 2025 मध्ये वाघांच्या मृत्यूत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर होता.

# अदानींवर चौकशीचे सावट

## लाचखोरीप्रकरणी 'एसई'कडून समन्स बजावण्यासाठी न्यायालयाकडे परवानगी



**मुंबई :** अमेरिकेची बाजार नियंत्रक असलेल्या सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशनने (एसईसी) कथित फसवणूक आणि 265 दशलक्ष डॉलरच्या लाचखोरीच्या प्रकरणात गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी यांना समन्स बजावण्यासाठी न्यायालयाची परवानगी मागितली आहे. या वृत्तांमुळे शुक्रवारच्या सत्रात अदानी समूहाच्या कंपन्यांच्या समभागांत 13 टक्क्यांपर्यंत घसरण झाली.

अमेरिकी गुंतवणूकदारांकडून पैसे उभारणाऱ्या अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेडशी निगडित हे प्रकरण आहे. नोव्हेंबर 2024 मध्ये 'एसईसी'ने दाखल केलेल्या आरोपपत्रात मुख्यत्वे लाचखोरी आणि फसवणूक असा ठपका अदानी आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर आहे. निधी उभारणी करताना खोटे आणि दिशाभूल करणारे विधान गौतम अदानी आणि सागर अदानी यांनी केले आणि हा अमेरिकेच्या नियामक कायद्यांचे उल्लंघन असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. अदानी समूहाने मात्र अमेरिकेच्या न्याय विभाग आणि एसईसीने अदानी ग्रीनच्या संचालकांवर केलेले आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. भारताच्या सौर ऊर्जा महामंडळाकडून मोठी कंत्राटे मिळविण्यासासाठी लाच दिल्याचा आरोपही फेटाळला आहे.

दरम्यान, अमेरिकी नियामक मंडळाने न्यूयॉर्कमधील ब्रुकलिन येथील न्यायालयात, समन्स बजावण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांकडून मदत मिळवण्यात त्यांना अपयश आल्याचे सांगितले. भारत सरकारने समन्स बजावण्याच्या दोन विनंत्या यापूर्वी नाकाल्याचे एसईसीने सांगितले. त्यानंतर नियामक मंडळाने अदानी यांना ईमेलद्वारे नोटिसा बजावण्याची परवानगी मागितली आहे.

अदानींवर चौकशी सावट निर्माण झाल्यानंतर समूहाच्या कंपन्यांच्या समभागांत 13 टक्क्यांपर्यंत घसरण झाली. अदानी एंटरप्रायझेसला सर्वाधिक फटका बसला. कंपनीचा शेअर 10.65 टक्क्यांनी म्हणजेच 222 रुपयांनी घसरून 1,864.20 रुपयांवर बंद झाला. कमकुवत तिमाही निकाल आणि नियामक घडामोडींमुळे समूहाच्या इतर कंपन्यांच्या समभागांनाही झळ बसली.

# खुनाचे आरोपी, तुरुंगात फुलले प्रेम

## लग्नासाठी न्यायालयाने दिला 15 दिवसांचा पॅरोल

**जयपूर :** राजस्थानमधील जयपूर येथील तुरूंगात खुनाच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या प्रिया सेठ आणि हनुमान प्रसाद यांनी एका गुप्त समारंभात लग्न केले आहे. या लग्नाची कहानी विचित्र आणि आश्चर्यकारक आहे. प्रिया सेठने 2018 साली दुष्यंत शर्माचा खून केला होता. तर हनुमान प्रसादने 2017 साली त्याच्या प्रेयसीच्या पतीचा आणि चार मुलांचा खून केला होता. दोघेही खुनाच्या आरोपाखाली जयपूरच्या खुल्या तुरूंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. इथेच त्यांची ओळख झाली आणि त्यांनी पुढे कुटुंबाच्या परवानगीने लग्न करण्याचा निर्णय घेतला.

प्रिया सेठीने 2018 साली डेटिंग ?पवरून एका मुलाशी ओळख वाढवली आणि त्याला आपल्या घरी कुणी नसल्याचे सांगून भेटायला बोलावले. मुलगा भेटण्यासाठी आल्यानंतर प्रिया आणि तिच्या प्रियकराने त्या मुलाचे अपहरण केले आणि त्याच्या वडिलांकडून 10 लाखांची खंडणी मागितली. यानंतर मुलाच्या वडिलांनी 3 लाख रुपये दिले. मात्र मुलाला सोडल्यानंतर पोलीस आपल्याला पकडतील या भीतीने प्रिया सेठ आणि तिच्या प्रियकराने त्या मुलाचा खून केला. त्यानंतर मृतदेह आमेरच्या डोंगर रांगेत फेकला. मृतदेह आढळल्यानंतर प्रिया सेठ आणि तिच्या प्रियकराला अटक झाली. हनुमान प्रसाद अलवर जिल्ह्यातील आहे. त्याला 2017 साली त्याच्या विवाहित प्रेयसीच्या सांगण्यावरून तिचा पती आणि चार मुलांची हत्या केली होती. या गुन्ह्यात हनुमान जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. प्रिया आणि हनुमान हे दोघेही जयपूरच्या खुल्या कारागृहात बंद होते. इथेच त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. गेल्या सहा महिन्यांपासून दोघेही प्रेमसंबंधात होते. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयाकडे लग्नासाठी पॅरोल मागितला. यानंतर न्यायालयाने त्यांना 15 दिवसांचा पॅरोल मंजूर केला. दोघांनीही घरातल्यांच्या संमतीने 23 जानेवारी रोजी लग्न केले.

# इरणमधील आंदोलनाबाबत खामेनींच्या सहकाऱ्याची भारतातून मोठी कबुली!

**नवी दिल्ली :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला सय्यद अली खामेनी यांच्या एका सहकाऱ्याने भारतातून एक महत्वाचे विधान केले आहे. त्यांनी इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनांमध्ये लोकांचा मृत्यू झाल्याचे मान्य केले आहे, मात्र यावेळी त्यांनी सरकारकडून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाल्याचे दावे फेटाळून लावले आहेत. सांगितली जात असलेली आकडेवारी खोटी असून परकीय हितसंबंधांमुळे पसरवली जात असल्याचे म्हटले आहे.

इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचे प्रतिनिधी अब्दुल माजीद हकीम इलाही म्हणाले की, इराण आणि इतर सभोवतालच्या प्रदेशातील परिस्थिती सुधारेल अशी त्यांना आशा आहे. तसेच त्यांनी देशाच्या आर्थिक संकटाच्या स्थितीसाठी इराणवर आलेल्या निर्बंधांना दोष दिला.

खरंतर आम्ही आशा व्यक्त करतो की परिस्थिती चांगली होईल. आम्ही शांतता आणि सुरक्षितता यासाठी प्रयत्न करत आहोत, पण काही इतर लोकांना ते नको आहे, कारण काही लोकांनी निर्माण केलेले हे संकट आणि या समस्यांमुळे संपूर्ण प्रदेश आणि मध्य पूर्व होरपळून निघत आहे. सर्व देशांवर या संकटाचा परिणाम होईल. आम्हाला आशा आहे की सर्वकाही शांत होईल आणि पुन्हा एकदा सर्वत्र शांतता व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होईल, असे ते वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले. इराणमध्ये डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू झालेले सरकारविरोधी आंदोलन संपूर्ण देशात पसरली आहेत. या आंदोलनांमुळे जागतिक स्तरावर, विशेषतः अमेरिका आणि इराणमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. इराणमधील सत्ताधारी राजवटीने हे आंदोलन दडपण्यासाठी केलेल्या कथित हिंसक कारवाईत हजारो लोकांचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात आहे. यातच अमेरिकेने अनेकवेळा आंदोलकांविरोधातील हिंसाचार थांबवला नाही तर इराणमध्ये लष्करी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

इलाही यांनी आर्थिक स्थितीबाबत लोकांमध्ये संताप असल्याचे मान्य केले मात्र दावा केला की इतरांकडून या अस्थिरतेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. इराणमध्ये आर्थिक अडचणी आहेत कारण त्याच्यावर निर्बंध लादण्यात आले आहे. आणि काही लोक रागात आहेत पण इतर लोक या संधीचा फायदा घेऊन स्वतःचा हेतू आणि ध्येय पूर्ण करण्यासाठी फायदा घेत आहेत असे ते म्हणाले.

इराणमधील परिस्थितीबद्दल बोलताना इलाही म्हणाले की, इराणमधील परिस्थितीबाबत बोलायचे झाल्यास, खरं तर दोन गोष्टी आहेत ज्या आपल्याला एकमेकांपासून वेगळ्या करून पाहिल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे परिस्थितीबाबत तथ्य आणि वास्तव . दुसरी गोष्ट म्हणजे कल्पना, जी पत्रकारांच्या सांगण्यातून, शत्रू राष्ट्रांकडून किंवा इतर लोकांकडून निर्माण केली गेली आहे. या दोन वास्तवांमध्ये खूप मोठी दरी आहे,असे ते म्हणाले.

देशभरातील आंदोलन हिंसकपणे दडपताना मृत्यू झालेल्या नागरिकांबाबत विचारले असता इलाही यांनी मृत्यू झाल्याचे मान्य केले मात्र आकडे चुकीचे असल्याचे म्हटले. पहिल्यांदा या आंदोलकांनी सामान्य नागरिकांवर, पोलीस आणि उद्योजकांवर हल्ले केले आणि त्यांच्या हत्या केल्या कारण त्यांना या परिस्थितीचा फायदा घ्यायाचा होता, आणि त्यांनी सांगितले की या लोकांची हत्या पोलिसांनी केली आहे, जे की खरे नाहीयेज होय यूके, अमेरिका आणि युरोपीय देशांमधील काही संघटनांनी मृतांचे आकडे सांगितले आहेत. पण हे आकडु चुकीचे आणि बनावट आहेत. या हत्या सरकारकडून झाल्या आहेत असे दाखवण्यासाठी त्यांना मृतांचा आकडा वाढवायचा आहे, असे ते म्हणाले.

# अमेरिकेत भीषण हिवाळी हिमवादळ येण्याचा इशारा

**वॉशिंग्टन :** अमेरिकेमध्ये शुक्रवारपासून पुढील दिवस भीषण हिवाळी हिमवादळ येण्याचा इशारा तेथील हवामान विभागाने (नॅशनल वेदर सर्व्हिस) दिला आहे. त्यामुळे 14 राज्यांमध्ये आपत्कालीन स्थिती जाहीर करण्यात आली असून अमेरिकेत आणि अमेरिकेबाहेर उड्डाण करणारी 1,400पेक्षा जास्त विमाने रद्द करण्यात आली आहेत. वायव्य टेक्सास आणि ओक्लाहोमा शहरात जोरदार बर्फवृष्टी सुरू झाली आहे.

या हिमवादळाची तीव्रता इतकी जास्त असेल की त्यामुळे 17 कोटींपेक्षा जास्त नागरिकांना, म्हणजेच देशाच्या जवळपास निम्म्या लोकसंख्येला फटका बसणार आहे. त्यामुळे झाडे व विजेचे खांब उन्मळून पडतील आणि अनेक दिवस वीजपुरवठा खंडित होईल असा इशारा नॅशनल वेदर सर्व्हिसने शुक्रवारी दिला. 14 राज्यांत आणीबाणी; हवामान विभागाकडून तीव्र हिमवादळाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हिमवादळ जवळ येत असल्याने अलाबामा, आर्कान्सा, जॉर्जिया, लुईझियाना, मिसिसिपी, मिसूरी, नॉर्थ कॅरोलिना, साउथ कॅरोलिना, टेनेसी, टेक्सास आणि व्हर्जिनिया या 11 राज्यांसह अन्य तीन राज्ये आणि डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबियाने आपत्कालीन स्थिती जाहीर केली आहे. डॅलस येथील दोन विमानतळांना सर्वाधिक फटका बसला असून देशभरात 1,400पेक्षा जास्त देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांची उड्डाणे रद्द करावी लागली आहेत. ओक्लाहोमाच्या वाहतूक विभागाने सैनिकांच्या सुट्ट्या रद्द केल्या आहेत. ठिकठिकाणी अडकलेल्या वाहनचालकांना मदत करण्यासाठी नॅशनल गार्डची मदत घेतली जात आहे. अमेरिकेच्या दक्षिण भागात टेक्सास ते न्यू इंग्लंड या तीन हजार किलोमीटरपेक्षा जास्त भागांत हे हिमवादळ येईल. टेक्सासपासून ओक्लाहोमा, वॉशिंग्टन डी.सी., न्यूयॉर्क आणि बोस्टन येथे 30 सेंमीपेक्षा जास्त बर्फ पडण्याचा अंदाज आहे. मेम्फिस, नॅशविल, बाल्टिमोर आणि फिलाडेल्फिया ही शहरेही बर्फाच्या चादरीखाली झाकली जाऊ शकतात. मिनेसोटा आणि नॉर्थ डाकोटाच्या काही भागात उणे 46 अंश सेल्सियसपर्यंत तापमान घसरू शकते.

न्यूयॉर्कच्या महापौरपदाची शपथ घेतल्यापासून झोहरान ममदानी यांच्यासाठी या हिमवादळाच्या रूपाने पहिलीच मोठी परीक्षा होणार आहे. न्यूयॉर्कचे सफाई कामगार देशातील सर्वात मोठी हिमविरोधी मोहीम हाती घेणार असल्याचे त्यांनी माध्यमांना सांगितले. न्यूयॉर्कमध्ये रविवारी वादळ धडकण्याची शक्यता आहे.

18 वा स्मृती दिन

सौ. कान्होपात्रा सदाशिवराव ढाले




: शोकाकुल :

आयु. उषा कुंभारे
आयु. पुष्पा टिपले
आयु. माला कांबळे
आयु. पद्मा बहादूरे
आयु. निशा कांबळे
आयु. अर्चना झोडापे
आयु. मिलिंद, उमेश,
आयु. सिद्धार्थ ढाले.




# इंडोनेशियात जावा बेटावर भूस्खलन; आठ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** इंडोनेशियातील जावा या मुख्य बेटाला मुसळधार पावसाचा फटका बसला आहे. शनिवारी (24 जानेवारी) पहाटे साडे तीनच्या सुमारास झालेल्या भूस्खलनात आठ जणांचा मृत्यू झाला असून, 82 जण बेपत्ता झाले आहेत. सध्या बेटावर बचावकार्य सुरु आहे.

वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, पश्चिम जावा प्रांतातील पश्चिम बांडुंग जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने थैमान घातले आहे. मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आला आहे. सततच्या पावसामुळे काही भागात भूस्खलन झाले असून, जावा परिसरातील



34 घरे चिखल, दगडाखाली गाडली गेली आहेत.

भूस्खलनात आठ जणांचा मृत्यू झाला असून, 82 जण बेपत्ता आहेत. अनेक नागरिक ढिगाऱ्याखाली गाडल्याची भीती व्यक्त केली आहे. बचाव पथकांच्या मदतीने बेपत्ता नागरिकांचा शोध घेतला जात आहे. या दुर्घटनेत 24 जण थोडक्यात बचावले आहेत, अशी माहिती राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे प्रवक्ता अब्दुल मुहरी यांनी दिली आहे.

भूस्खलानामुळे पासिर कुनिंग हे लहान गाव सर्वाधिक प्रभावित झाले आहे. पहाटे तीनच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे आठ जणांचा मृत्यू झाला. बचाव पथकांना आठ नागरिकांचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.

परिसरातील रस्ते आणि भातशेती चिखलाने माखली आहे. संपूर्ण गाव चिखल, दगड आणि उन्मळून पडलेल्या झाडांखाली झाकले गेलेत. मुसळधार पाऊस आणि सैल झालेली जमीन यामुळे बचाव कार्यात अडचण येत आहे, अशी माहिती पश्चिम जावाच्या आपत्कालीन व्यवस्थापन कार्यालयाचे प्रमुख टेटेन अली मुंगकू एंगकुन यांनी दिली आहे.

भूस्खलनानंतर आपत्कालीन प्रतिसाद पथकांना त्वरित घटनास्थळी तैनात करण्यात आले. आणखी भूस्खलन होण्याची भीती असल्याने, भूस्खलन क्षेत्राच्या 100 मीटर (यार्ड) परिसरात राहणाऱ्या कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे, असे टेटेन अली मुंगकू एंगकुन म्हणाले.

बानाई क्रेडिट को-सोसायटी, नागपूर




पदाचे नाव : शाखा व्यवस्थापक.

नोकरीचे ठिकाण : बेझनबाग, नागपूर कार्यालय.

शैक्षणिक पात्रता : कोणत्याही शाखेतील पदवी (कम्प्युटर व IT ज्ञान आवश्यक). कॉमर्स पदवीधर शिक्षण असल्यास प्राधान्य दिले जाईल.

अनुभव : सहकारी पतसंस्था क्षेत्रातील किमान 6 वर्षांचा वरिष्ठ सहायक किंवा 3 वर्षांचा व्यवस्थापक पदाचा अनुभव आवश्यक.

आवश्यक कौशल्ये : MS Office (Word, Excel, PowerPoint) मध्ये प्राविण्य. स्कॅनिंग, प्रिंटिंग व बेसिक पोर्टल, पत संस्था सॉफ्टवेअर ऑपरेशन्सचे ज्ञान. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये प्राविण्य.

संपर्क : अविनाश मेश्राम, अध्यक्ष मो. 9689922035

“ अडचणी म्हणजे थांबायचा इशारा नाही. त्यापुढे जाण्याची ताकद देतात. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# गुलामी विरुद्ध लढताना दक्षता घ्यावी लागेल!

**मानसिक गुलाम असलेल्या गुलामांना गुलामीची जाणिव रहात नाही. ते गुलामी हाच आपला अलंकार समजतात. त्यात त्यांचा दोष नाही. ते त्यांचे अज्ञान आहे. हे मानसिक गुलाम नसणाऱ्या समजदार लोकांनी प्रथम समजून घ्यावे. हे जर समजून घेतले नाही तर ‘आंधळे दळते आणि कुत्रं पीठ खात’ या म्हणी सारखे होईल. काही लोक जागृती करून लढा उभारण्याचे काम करतील आणि उथळ लोक आपल्या वात्रट आणि टोचून बोलण्याने लढा विस्कळित करीत जातील. लाभ काहीच होणार नाही. म्हणून ही दक्षता घेतली पाहिजे. हे लक्षात घ्या की आज आपण बोलू शकतो. लिहू पण शकतो. 2029 साली जर पुन्हा मोदी सरकार आले तर ते देखील बंद होईल. आज देखील मर्यादा आल्या आहेत याचा अभ्यास करून लिहा आणि बोला.**

हुकूमशाही ही दमन करणारच. आजही दमन प्रक्रिया अमर्याद नाही आहे. म्हणून त्या मर्यादेत राहून आपण समाजाचे वैचारिक प्रबोधन केले पाहिजे. आपल्या कामात कायदेशीरपणा असावा याची काळजी घ्या. कारण सरकार आपल्याला बेकायदा कृत्यात सहभागी आहात म्हणून सिद्ध करण्यासाठी टपून बसले आहेत. आपल्याला असा समज झाला असतो की आपण जे लिहिले ते सर्व देशातील लोकांनी वाचले असेल पण तो गैरसमज आहे. ज्यांनी ते वाचावे असे आपणास वाटते ते लोक वाचण्याचे संवयी पासून कोसो मैल दूर आहेत. ज्यांचे करीता आपण लिहितो ते लोक पेपर आणि पुस्तक वाचत नाहीत. जे मोजके जागृत लोक आहेत तेच पेपर आणि पुस्तक वाचतात. त्यातल्या त्यात त्यांनी जे वाचले ते विचार आपल्याच जवळ ठेवतात. आपल्या घरातील मुलामुलींना आणि पत्नीला सांगतील याचीही शाश्वती नाही. जे सांगतात त्यांचे कुटुंबीय देखील ऐकतील हे पण सांगता येत नाही. आता सकारात्मक चित्र फार दुर्मिळ आहे. हेच दुःखद वास्तव आहे. परंतु लढाई सुरू करताना आपले बलस्थान आणि दुर्बलता ओळखण्याची आपल्याला गरज आहे. हवेत राहून स्वातंत्र्यासाठी युद्ध लढता येत नाही. म्हणून जे आपल्यासोबत आहेत त्यांनाच घेऊन संघटितपणे हे स्वातंत्र्य युद्ध सुरू करावे लागेल. प्रसिद्धीच्या मोहात पडून ही लढाई सुरू करू नये. त्यामुळे शत्रू लवकर जागृत होईल. परंतु आपले लोक मात्र खूप उशिरा जागे होतील. तोपर्यंत वेळ निघून गेली असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे केले ते शत्रूला समजले. पण ज्यांचे करीता त्यांनी कार्य केले आणि बोलले ते लोक मात्र समजलेच नाही. शत्रू मात्र त्यांचेपर्यंत पोहचले आणि त्यांना त्यांच्या कळपात सामील करून घेऊनही गेले. त्यांनाच पुढे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विरुद्ध लढणारा समूह बनवले. ते त्यांनाच शत्रू मानू लागले. त्यांचे पुतळे तोडू लागले. आपल्या विरुद्ध दंगलीत सामील झालेत. भाजप सारख्या शत्रुलाच सत्ताधारी करण्याचे प्रयत्न करू लागले. हेच चित्र दिसून येत आहे. हिंदू कोड बिल विरुद्ध हिंदू स्त्रिया मोर्चा काढून आंबेडकरांना विरोध करू लागल्या होत्या हा इतिहास आपण सर्वांनी पाहिला. मंडल आयोगाच्या अंमलबजावणी साठी कांशीराम साहेबांनी सर्वप्रथम देशभर लढा दिला. मंडल आयोग ज्यांच्या हिताचा होता. त्याच ओबीसी लोकांनी गुजरात राज्यात आरक्षण विरुद्ध दंगल करून दलितांना उध्वस्त केले.

कांशीराम साहेबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नंतर सर्व प्रथम बहुजन समाजाची संघटना बांधणीसाठी प्रामाणिक प्रयत्न केले. तेव्हा त्यांचा आणि बहुजन वादाचा विरोध प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले आणि जे आज स्मृतिशेष झाले त्या सर्व आंबेडकरी रिपब्लिकन नेत्यांनी केला. कांशीराम साहेबांच्या मृत्यूनंतर प्रकाश आंबेडकर व रामदास आठवले त्याच बहुजन लोकांना संघटित करण्याची आज भाषा करीत आहे. त्याच वेळी हे सुचले असते तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप ची हुकूमशाही आज आलीच नसती. कारण तुमचीच सत्ता प्रस्थापित झाली असती. उत्तर प्रदेशात जशी सत्ता आणली होती तशी देशभर देखील आली असती. भाजपने नियोजन केले आणि मात्र कांशीराम साहेबांच्या संघटनेत खिंडार पाडले आणि संघटन बटिक केले. आज रिपब्लिकन पक्ष आणि बहुजन समाज पक्ष भाजपला मदत होईल यासाठीच नकळत वापरल्या जात आहे. ही समीक्षा आजही या बहुजन आणि वंचितांना पचत नाही. त्यांना ती टीका वाटते. आपली समीक्षा करणे गरजेचे असते. आज देशातील निवडणूक केवळ देखावा तयार झाला आहे. निवडणूक आयोग राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपचा पोपट झाला आहे. तोच ठरवतो कोणाचे खात्यात किती जागा टाकाव्यात. त्यामुळे आज निवडणूक नाममात्र आहे. ज्यांना सत्ताधारी होण्यासाठी मताचा अधिकार मिळाला ते गुलाम लोक केवळ निवडणूक पैसे कमावण्याचे साधन मानत आहेत. गुलामांचे राजकीय पक्ष हे त्यांच्या नेत्यांचा मतं विक्रीचा ठोक उद्योग करणारी कंपनी झाली आहे. मतदार आपल्या घरातील चार लोकांचे वीस हजार रुपये घेतो तर त्यांचे नेते आपल्या लाखो लोकांचे बदल्यात 500 कोटी घेतात. मते विभाजन करून भाजपला निवडून आणण्यासाठी लोभापाई हा प्रयत्न असतो. परंतु हे लक्षात घ्यावे की देशात हुकूमशाही जेव्हा प्रवेश करते तेव्हा असेच वातावरण हुकूमशहा निर्माण करीत असतो. अराजक निर्माण झाले असते. लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असतो. आज तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. काँग्रेस, भाजप, सेना, बसपा, रिपब्लिकन किंवा दलीत, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन हा आता मुद्दाच नाही. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ब्राम्हण आणि भांडवलदार विरुद्ध सर्व दलीत, आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, कम्युनिस्ट, स्त्रिया, कामगार, शेतकरी, मजूर आणि विवेकी, पुरोगामी, लोकशाहीवादी ब्राम्हण असाच लढा रहाणार आहे. फक्त आपण कोणत्या बाजूचे आहोत हे ज्यांनी त्यांनी ठरवायचे आहे. काही लोक आपल्या बाजूने आज राहतील आणि नंतर त्यांचे कळपात निघून जातील. तसेच त्यांचे कळपात असलेले आपले लोक देखील आपण गुलाम असल्याची जाणीव झाल्यावर आपल्या बाजूला देखील येतील. हे धृवीकरण होत राहील हे देखील लक्षात घ्यावे लागेल. आज आपण पाहतो की संघ आणि भाजपमध्ये असलेले लोक संघ भाजप सोडून त्यांचे विरोधात येत आहेत. काल तेच त्यांचे साठी भांडत होते. काँग्रेस, भाजप, सेना, राष्ट्रवादी, जनता दल इत्यादी पक्षात असलेले आपले लोक त्या पक्षातील आतील गोटात नसतात. त्यामुळे ते त्यांचे वैचारिक अनुयायी कधीच नसतात. ते वापरल्या जाणाऱ्या मध्ये असतात. त्यांचा ते केवळ वापर करतात. म्हणून कधीतरी ते त्यांचे पासून दूर होतील. दुसरी बाब म्हणजे ‘काँग्रेस मुक्त भारत’ ही घोषणा समजून घ्या. काँग्रेसमध्ये पाठवलेले संघ प्रणित लोकांनी आता काँग्रेसमधून बाहेर पडावे आणि भाजपत यावे. असा त्याचा अर्थ आहे. सोनिया - राहुल - प्रियंका गांधी ही एकांगी पडलेले नेते आहेत. ते भाजपमध्ये जाऊ शकत नाहीत. तसेच कम्युनिस्ट, समाजवादी लोक भाजप मध्ये जाऊ शकत नाहीत. कारण ती त्यांची वैचारिक बांधिलकी आहे. ज्यांची वैचारिक बांधिलकी नाही ते भाजपचे मार्गावर आहेत.





लेखांक १४३



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

‘एक देश एक पक्ष’ या अश्याच दुसऱ्या घोषणेचा अर्थ आहे आता लोकशाही संपली. ब्राम्हणशाही आणि त्यांची हुकूमशाही आली. लोकसभा राज्यसभा ही आता या पुढे कदाचित राहणार नाही. त्या जागेवर ब्राम्हण गोसाव्याची धर्मसंसद राहील. संविधान सभेने तयार केलेले भारतीय संविधान याची जागा मनुस्मृती घेईल. त्या दिशेने त्यांनी केलेली प्रतिक्रांती वाटचाल करीत आहे. ती तयारी 1925 पासून संघाचे हेडगेवार, गोळवलकर, सावरकर, मुंजे, उपाध्याय पासून तर आज मोहन भागवत यांच्या पर्यंत लोकांनी करीत आणली आहे. आपल्यासाठी 1947 नंतर असलेली राजनीती सत्तेचे राजकारण होते. त्यांचेसाठी मात्र प्रतिक्रांती होती. आपल्यासाठी व्यक्तिगत नेतेगिरी होती. त्यांचेसाठी प्रतिक्रांती करणारे ते योद्धा होते. म्हणून ते पद, प्रतिष्ठा प्रसिद्धी या पासून दूर राहिले आपण नेमके स्वार्थी हेतूने सत्ता लोलुप झालोत. म्हणूनच कुत्र्यासारखे भांडत राहिलो. खेकड्यासारखे एक दुसऱ्याचे पाय ओढीत राहिलो. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1949 साली जाणले होते. म्हणून ते काळीज पिळवटून सांगत होते. ‘आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य काही कामाचे नाही. हे राजकीय स्वातंत्र्य आपण गमावून बसू.’ पण आपण कुणीही त्यांचे ऐकले नाही. ना काँग्रेसने, ना कम्युनिस्टांनी, ना समाजवाद्यांनी ना आंबेडकरवाद्यानी मानले. म्हणून आजची परिस्थिती निर्माण झाली. आता तरी आपण सर्वांनी सर्व चुका समजून सावध झालो पाहिजे. एक दुसऱ्याला दोष देण्याचा हा काळ नाही. सर्वांच्याच चुका झाल्या. आपले सर्वांचेच अज्ञान होते. तेच उगाळत बसणे आणि आपसात वाद करणे हे शहाणपणाचे तर नाहीच पण व्यावहारिक देखील नाही. म्हणून या नव्या संकटांची जाणिव करून घ्या. सर्वजण जुने विसरून जा आणि नव्याने गुलामी विरुद्ध लढणारा समाज निर्माण करा. संघर्ष केला तरच आपण गुलामगिरीचा कालावधी कमी करू शकतो. आज गुलामीचे चटके कमी मिळत आहे. हळू हळू ते तीव्र होत जातील. एक दिवस ते इतके तीव्र होतील की इतिहास काळात समाजाला नेऊन ठेवतील.

1947 पासून त्यांनी हे प्रयत्न सुरू केले होते. लोकशाहीवरचा विश्वास कसा कमी होईल असे वातावरण ते तयार करीत होते. विधायक वातावरण निर्माण करण्यात कुणीही समजदारी दाखवली नाही. सक्षम विरोधी पक्ष निर्माण करून सरकारकडून सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी पाहिजे ते प्रयत्न न करता केवळ सत्तेसाठी स्पर्धा करीत राहीलोत. काँग्रेस सरकारने काही काळ प्रयत्न केले म्हणून शिक्षण आपल्यापर्यंत पोहोचले. अस्पृश्यता निवारण पूर्णपणे जरी झाले नसले तरी बऱ्यापैकी होत गेले. आर्थिक विषमता पूर्णपणे नष्ट झाली नसली तरी काही प्रमाणात कमी झाली. या सामाजिक आणि आर्थिक विषमता कष्ट करणे या समस्येवर भाजपच्या लोकांनी रान न उठवता काँग्रेस किती भ्रष्टाचार करते यावर रान उठवले. आपण लोक त्याला बळी पडलो आणि लोकांनी काँग्रेस नष्ट केली. आज भाजपने आपला खरा रंग दाखवला. आपण सर्व भाजप काँग्रेस विरोधकांनी संतुलन साधले नाही. काँग्रेसला नको तेवढे दुर्बल होऊ दिले. भाजपला नको तेवढे बलवान होऊ दिले. आपण स्वतः बलवान न होता वानर जसे या झाडावरून त्या झाडावर उड्या मारतात तसे लोक सकाळी काँग्रेसमध्ये आणि सायंकाळी भाजपात जाऊ लागलो. कम्युनिस्ट पक्ष सोडून ते लोक काँग्रेस भाजप मध्ये गेले नाही. आंबेडकरवादी, गांधीवादी, सुधारणावादी आणि समाजवादी कधी काँग्रेस तर कधी भाजपामध्ये जात येत राहिले. त्यामध्ये आपण आपलाच घात करीत बसलो. आता या सर्व कालच्या चुका झाल्यात. आज त्या उगाळत बसणे योग्य नाही. आजची समस्या सोडविण्यासाठी संघर्ष करावा म्हणून सर्वांनी भाजप, संघ विरुद्ध ईतर सर्व असे समीकरण करणे हाच एकमेव उपाय आहे. आपण सर्व लोकांनी सत्तेसाठी राजकारण न करता गुलामी विरुद्ध स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणे हे नवे समीकरण हाच एकमेव उपाय आहे. या सर्व दक्षता बाळगली पाहिजे. ■ ■

# जीवनदायिनी ‘रेखा’!





**माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे यांनी पत्नीवर कृतज्ञतापूर्वक लिहिलेले ‘रेखा’ हे स्वकथन नुकतेच प्रकाशित झाले. महानगरीय पर्यावरणात वाढलेली रेखा मखमली पायघड्यांचा त्याग करीत एकनाथ खोब्रागडे नावाच्या तरुणासोबत जनमार्गावर निघून अहेरी-गडचिरोलीच्या अंधारवनात दुःखीतांवर आभाळमाया करीत परिवर्तनाचे नवे हुंकार फोडण्याच्या प्रकल्पांना कशी साथ देते याचे वास्तव लेखकाने या पुस्तकातून रेखाटले आहे.**

चंद्रपूर जिल्ह्यातील सावरी (बिडकर) हे इ. झेड. यांचे गाव. बाबा आमटेंच्या आनंद निकेतन महाविद्यालयात अनवाणी पायाने जाणारे एकनाथ पुढे कलेक्टर होऊन पिवळ्या दिव्याच्या गाडीत सन्मानपूर्वक बसले. अभावग्रस्त परीस्थितीशी लढत ते पदवीधर झाले. प्रभा आत्याच्या घरी पाहुणपणाने आलेल्या मुंबईच्या ‘रेखा’ या नाजूक, सुंदर, सुस्वभावी, शांत, शाळकरी पोरीने एकनाथच्या काळजावर आपले नाव अजाणतेपणे ‘रेखा’टले. मात्र यालाच प्रेम म्हणतात, हे काही कळले नव्हते. ‘मी रेखाशी बोलू शकत नव्हतो. परंतु तिला बघत होतो’, असा कबुलीजबाब लेखकाने दिला आहे. रेखाला यातील काहीही माहित नव्हते. ती ओळख कुठेतरी हृदयात राहून गेली. तिचा चेहरासुद्धा! हे आपल्या प्रेमाचे लेखकाने व्यक्त केलेले गुपित रोमँटिक वाटते.

रेखाशी लग्न करण्यासाठी तिच्या लायक बनले पाहिजे. या सम्यक विचारातून लेखक मार्गस्थ झाले. नागपूर विद्यापीठात एम.एस्सी.चे शिक्षण, ऑर्डनन्स फॅक्टरी अंबाझरी, ओरिसातील चांदीपूर, ओएनजीसी देहरादूनमध्ये नोकरी, पुढे ओएनजीसी मध्येच वर्ग 1 साठी निवड, मुंबईमध्ये पोस्टिंग आणि या दरम्यान लेखकाने त्यांच्या या एकतर्फी प्रेमातून सात वर्षे केलेल्या पाठपुराव्याचे रेखाचित्र या पुस्तकातून चितारले आहे. रेखाच्या वडिलांचे पत्र वाचून लेखकाच्या आनंदाला उधान येते. ‘तिला मी आवडलो आणि एवढ्या काळात तिचे माझ्यावर प्रेम जडले असेल’, असा जणू ठरावच लेखकाच्या मनात त्यावेळी आयोजित विशेष सभेत पारित होतो. नागपुरात रेखा-एकनाथ यांचा मंगल परिणय सोहळा संपन्न झाला. लेखक आपल्या नववधूला वरोऱ्यावरून सावरीला बैलगाडीत बसवून घेऊन जातात. तेव्हा, हा प्रसंग वाचताना ‘नादिया के पार’ चित्रपटातील ‘कौन दिशा में लेके चला रे बटुहिया?..’ हे सुमधूर गीत आठवते. मुंबईत संसार सुरु झाला. यांना घरातले काही कळत नाही हे कळून चुकले होते. लेखक आपला सांसारिक अडाणीपणा अजिबात लपवत नाही. एकदा लेखकाचे वडील मुंबईला भेटीला आले. ‘स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी कलेक्टर हो आणि समाजाची सेवा कर!’ हे प्रवर्तनिय विचार वडिलांनी रेखाला समजावून सांगितले आणि तिने लेखकालाही समजावून सांगावे असे ठणकावले. निरक्षर पण शहाणे व बुद्धिमान असलेल्या वडिलांच्या डोक्यात आलेले विचार ही डॉ. बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीची फलनिष्पती आहे, असे लेखक अभिमानाने सांगतात. वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी खोब्रागडे एमपीएससी देतात. परीक्षा दोघांची होती. पेपर लेखक देत असले तरी परीक्षेदरम्यान रेखाने रात्र-रात्र जागून लेखकाला साथ दिली. प्रोत्साहन दिले. इ. झेड., एमपीएससी उत्तीर्ण होत उपजिल्हाधिकारी झाले. रेखाने हे घडवून आणले, असे लेखकांनी प्रांजळपणे मांडले आहे. उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर रेखाने तिन अटी घातल्या. पहिली - दारू प्यायची नाही, कुठलेही व्यसन करायचे नाही. दुसरी - जमेल तेवढे लोकांसाठी प्रामाणिकपणे काम करायचे. तिसरी - काम करतांना बेईमानी करायची नाही. कोणाकडून काही घ्यायचे नाही. भ्रष्टाचार अजिबात करायचा नाही. हा दोघांमधील अलिखित बाँड इ. झेड. यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे पाळला. देशातील सर्वच अधिकारी-कर्मचारी पती-पत्नीने याचे अनुकरण केले तर भ्रष्टाचारमुक्त भारत सारख्या आंदोलनाची व लोकपाल-लोकायुक्ताची सुद्धा गरज उरणार नाही. या अटी मुर्दाडमनात दावाग्नी चेतविणारे समाजसुत्र ठरू शकतात.

प्रशिक्षण पूर्ण होताच पहिली नियमित पोस्टिंग गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी या नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशील, दुर्गम व आदिवासी क्षेत्रात एसडीओ म्हणून झाली. बदली, पोस्टिंग, पद हा मुद्दा कुटुंबात चर्चेचा विषय होणार नाही हे रेखाने ठरवून टाकले होते. लोकहिताचे प्रशासन सुरु झाले. शोषण होणार नाही याची काळजी घेतली. अडचणी व आवाहने खूप होती. कुटुंबाच्या मदतीशिवाय काम करणे कठीण होते. रेखाचे संपूर्ण लक्ष होते. रेखाने हिंमत दिली, मोकळीक दिली आणि मनोबलही वाढविले. रेखाच्या खंबीर सोबतीने लेखकाने प्रकाशयात्री होत घनघोर तमातून उजेडाकडे प्रवास आरंभला व अहेरी-गडचिरोली सारख्या अंधारकड्यावर नव्या उर्जायनाचा नवा इतिहास लिहिला.



डॉ. महेंद्रकुमार मेश्राम
मो.9975665862

अहेरीचे एक व्यावसायिक गृहस्थ दिवाळीच्या शुभेच्छा म्हणून घरी आले. दुसऱ्या दिवशी, सोफ्यावरील कुशन झटकताना रेखाला एक पाकीट दिसले. उघडून पहिले तर त्यात दहा हजार रुपये होते. दोघेही अस्वस्थ झाले. त्या गृहस्थाला घरी बोलावून विचारणा केली. ते गृहस्थ गडबडले. त्यांना लज्जित झाल्यासारखे वाटले. चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. पाकीट हातात घेत म्हणाले, ‘तुम्हाला ओळखण्यात माझ्याकडून चूक झाली’. रेखाच्या दृढनिश्चयी भूमिकेमुळे भ्रष्टाचाराची भाषा बदलत माणूसकीचे नवे पर्व सुरु होऊन सदाचाराची नवी भाषा येथे बोलल्या जाऊ लागली.

एके सायंकाळी घरी आल्यावर रेखाने प्रश्न विचारले. ‘त्या दोन माडियाचे काम झाले का? ते दोघे अजूनही झाडाखाली बसून आहेत.’ त्यावर खोब्रागडे उत्तरले, ‘कोण? मला भेटले नाहीत आणि माहितही नाही.’ ‘अवतीभवती, बाहेर अधूनमधून नजर टाकली पाहिजे. म्हणजे काय चालले आहे ते लक्षात येईल. ऑफिसात आलेल्यांना वाट बघावी लागणार नाही.’ रेखाच्या या बोलण्यात क्रांतीप्रसवधार होती. लेखकाने चूक कबूल करीत तात्काळ क्लार्कला बोलावून सर्व प्रक्रिया पूर्ण करुन त्यांचे काम केले. रेखा हा सर्व प्रकार पाहत होत्या. म्हणाल्या, ‘हे कालच व्हायला पाहिजे होते’. ‘मी तिला सॉरी म्हणालो’, असे लेखक लिहितात. तेव्हा त्यांना घट्ट मिठी मारावीशी वाटते. दिवाळीचा दिवस होता. रेखाने त्या दोन माडियांना घरी बोलावत त्यांचा पाहुणचार केला. त्यांना सन्मानपूर्वक जेवायला बसवून लाडू, वरण-भात, भाजी-पोळी त्यांच्या ताटात वाढले. ते संकोचले होते. रेखा शिपायाला म्हणाली, ‘आम्ही आत जातो, त्यांना पोटभर जेवायला द्या.’ लाडू हातात घेऊन ते गोल फिरवत होते. कधीही न पाहिलेले पदार्थ त्या दोन माडीयाने पहिल्यांदा खाल्ले होते. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून रेखाही आनंदली, हे लिहिताना लेखक रेखाप्रती आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतात. इ. झेड यांच्या सभोवताल वावरणारी अदृष्य यंत्रणा म्हणजेच रेखा, कोणताही शाब्दिक शृंगार न करता लेखकाने आपल्या अनुभवातून जसेच्या तसे ‘रेखा’टली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत सुंदर व अप्रतिम आहे. हे पुस्तक अनेकांच्या वाटा समृद्ध, प्रशस्त व जीवनप्रवाही करणारे असून पती-पत्नीच्या नात्याचे संविधान आहे. ■ ■

# मौनाशी संवाद साधणारा आत्मसंवाद

विदर्भ साहित्य संघाचा अण्णासाहेब खापर्डे स्मृती आत्मचरित्र लेखन पुरस्कार कविवर्य विष्णू सोळंके यांच्या ‘संवाद मौनाशी’ या आत्मचरित्रपर पुस्तकाला आज प्रदान करण्यात येत आहे. ही अमरावतीकरांसाठी गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे. अमरावती नगरीच्या साहित्य प्रांतातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे विष्णू सोळंके. साहित्यिक गटबाजीपासून अलिप्त राहून निरलसपणे लिहित राहणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे. राज्य परिवहन महामंडळात शिस्तबद्ध आणि वेळेच्या चौकटीत बांधलेली नोकरी करीत असतानाच त्यांनी साहित्यनिर्मितीचा अखंड ध्यास घेतला, ही नक्कीच वाखाणण्याजोगी बाब आहे.

‘काटा रुतून गेला’, ‘चंद्र अमृताचा’, ‘आक्रोश आसवांचा’, ‘देखणे हे दुःख आहे’ हे चार कवितासंग्रह; ‘अनुराधा एक पुनर्जन्म’, ‘हा चरित्रसंग्रह’, ‘धर्मशाळा आयुष्याची’, ‘अस्वस्थ कल्लोळ’ हे ललित लेखसंग्रह आणि ‘शाईचे गणगोत’ हा लेखसंग्रह – अशी त्यांची मौलिक साहित्यसंपदा आहे. ‘संवाद मौनाशी’ हे त्यांचे आत्मकथन अनेक वैशिष्ट्यांनी लक्षवेधी ठरते. लेखकाचे संघर्षमय बालपण, कौटुंबिक पार्श्वभूमी, आर्थिक चणचणींमुळे शिक्षणाची प्रचंड आवड असूनही बारावीनंतर लगेच स्वीकारावी लागलेली नोकरी, नोकरीतील ताणतणाव आणि वाढत्या कौटुंबिक जबाबदाऱ्या – असा एकूण जीवनप्रवास त्यांनी या आत्मकथनात अधोरेखित केला आहे. हे आत्मचरित्र कोणत्याही थरारक घटनांनी, मोठ्या यशकथांनी किंवा विलक्षण संघर्षांनी भारलेले नाही. ते एका साध्या, सरळ मार्गाने आयुष्य जगणाऱ्या सामान्य माणसाचे आत्मचरित्र आहे. पण याच साधेपणात या आत्मचरित्राचे वेगळेपण आणि सौंदर्य दडलेले आहे.

डॉ. अलका गायकवाड लुंगे
मो. 7972023507

जीवन महान ठरण्यासाठी ते नेहमी दिव्य असावे लागते असे नाही; ते प्रामाणिकपणे आणि सकारात्मकतेने जगले गेले तरच ते अर्थपूर्ण ठरते – हेच हे आत्मकथन ठामपणे अधोरेखित करते. ‘लेखन वाचणाऱ्याला विचार देतो, जगण्याचे बळ देतो’ या विश्वासातून लेखक आत्मचरित्र लेखनामागील स्वतःची भूमिका स्पष्ट करतात. पुरस्कार, प्रसिद्धी किंवा मानसन्मानासाठी नव्हे, तर सामान्य माणसाचे जीवनही कधीकधी संकटांनी खचलेल्या, निराश झालेल्यांना ऊर्जा देऊ शकते, या भावनेतून हे लेखन घडले आहे. या आत्मकथनात लेखकाचे प्रगल्भ आणि समंजस मन सतत जाणवत राहते. ‘आपले जगणे केवळ आपले नसते’ या जाणिवेतून अनेक व्यक्तीं विषयी कृतज्ञतेची भावना शब्दाशब्दांतून ओसंडून वाहते. ‘शाईचे गणगोत’, ‘जिवाभावाचे गणगोत’ असे संबोधन त्यांच्या भावविश्वाची खोली दर्शवते. पत्नीबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता त्यांच्या आदर्श सहजीवनाची साक्ष देते. सहवासातल्या स्त्रीकडे माणूस म्हणून पाहणाऱ्या त्यांच्या व्यापक मनाचे दर्शन येथे घडते. आज नातेसंबंध उपयोगितेच्या निकषावर मोजले जात असताना, या आत्मकथनातून कृतज्ञतेची भावना इतक्या प्रखरपणे व्यक्त होते, ही बाब विलक्षण आश्वासक ठरते. त्यामुळे हे आत्मकथन केवळ वैयक्तिक न राहता माणुसकीचा दीप उजळवणारा दस्तऐवज ठरतो. कवितेबद्दलची कृतज्ञताही लेखक तितक्याच भावनेने व्यक्त करतात. कविता नसती तर आपले आयुष्य केवळ एस.टी.तील कर्मचाऱ्यांच्या रूढ चौकटीत सीमित राहिले असते, ही प्रांजळ कबुली त्यांच्या नम्रतेचे दर्शन घडवते. लेखकाच्या जीवनदृष्टीत शांत सकारात्मकता आहे. संकटे, मर्यादा, अपयश यांचा उल्लेख करताना कुठेही कटूता नाही; उलट प्रत्येक अनुभवातून शिकण्याची वृत्ती दिसते. हे आत्मकथन भव्यतेपेक्षा साधेपणाचा उत्सव साजरा करणारे आहे. छोट्या छोट्या क्षणांत आनंद शोधण्याची कला, जीवनाकडे संवेदनशील नजरेने पाहण्याची वृत्ती वाचकांनाही नकळत प्रेरणा देते. कधीकाळी मजुरीसाठी यशोदानगर चौकात उभा राहणारा माणूस आज त्याच चौकात गाडीने फिरतो – हा बदल अहंकाराने नव्हे, तर प्रामाणिक प्रयत्नांच्या विजय म्हणून लेखक मांडतात. थोडक्यात, हे आत्मचरित्र स्वतःचे उदात्तीकरण नसून जीवन समजून घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. माणसे जोडण्याचे महत्त्व, संकटात धैर्य टिकवण्याची ताकद आणि सुखदुःखात समतोल राखण्याचे भान – ही या लेखनाची खरी शक्ती आहे. या लेखनासाठी लेखकाला मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन! ■ ■





# मतदार – भारतीय लोकशाहीचा आत्मा

25 जानेवारी हा दिवस भारतात ‘राष्ट्रीय मतदार दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका औपचारिक शासकीय कार्यक्रमापुरता मर्यादित नसून भारतीय लोकशाहीच्या आत्म्याशी जोडलेला अत्यंत महत्त्वाचा सामाजिक व राजकीय संदर्भ आहे. लोकशाही व्यवस्थेची खरी ओळख तिच्या संविधानात, संस्था किंवा कायद्यांमध्ये नसून तिच्या मतदारांमध्ये असते. मतदार हा लोकशाहीचा कणा आहे. त्याच्या जाणीवेवर, सहभागावर आणि सामाजिक भानावर लोकशाहीची दिशा ठरते. म्हणूनच राष्ट्रीय मतदार दिन हा केवळ मतदार नोंदणी किंवा मतदानाची प्रक्रिया आठवण करून देणारा दिवस नसून, मतदार म्हणून नागरिकाची सामाजिक, नैतिक आणि राजकीय भूमिका पुन्हा तपासण्याचा एक महत्त्वाचा क्षण आहे. भारतीय लोकशाहीचा प्रवास हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वाधिक विविधतेने भरलेला लोकशाही प्रयोग मानला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारण्याचा निर्णय घेतला, तो केवळ राजकीय नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातूनही क्रांतिकारी होता. त्या काळात भारतात निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते, दारिद्र्य व्यापक होते आणि जात, वर्ग, लिंग व धर्म यांच्या आधारे समाज खोलवर विभागलेला होता. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रौढ नागरिकाला समान मताचा अधिकार देणे हे केवळ धाडसीच नव्हे, तर सामाजिक समतेवर आधारित लोकशाहीची ठाम भूमिका मांडणारे पाऊल होते. या निर्णयामुळे भारतीय समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांना राजकीय मंचावर स्थान मिळाले आणि सत्तेच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता लोकशाही ही केवळ शासनाची पद्धत नसून ती एक व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजातील मूल्ये, परंपरा, सत्तासंबंध, आर्थिक रचना आणि सांस्कृतिक घटक यांचा लोकशाहीवर खोल परिणाम होत असतो. मतदार हा या सर्व घटकांच्या संगमातून घडलेला असतो. व्यक्तीचे मतदानवर्तन हे केवळ तिच्या वैयक्तिक पसंतीवर आधारित नसते, तर तिच्या सामाजिक ओळखीवर, जीवनानुभवांवर आणि सामूहिक वास्तवावर आधारित असते. जातीय रचना, वर्गीय विषमता, शैक्षणिक संधी, रोजगाराची स्थिती, लिंगसंबंध आणि माध्यमांचा प्रभाव या सर्वांचा मतदानावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. भारतीय राज्यघटनेने मतदाराला केवळ मताचा अधिकार दिला नाही, तर त्या अधिकारामागे सामाजिक न्याय आणि समतेची व्यापक संकल्पना मांडली. संविधानातील समानतेचे तत्त्व, मूलभूत हक्क आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे ही सर्व मतदाराच्या सशक्तीकरणाशी जोडलेली आहेत. मतदानाच्या माध्यमातून नागरिक केवळ प्रतिनिधी निवडत नाही, तर तो शासनाच्या दिशेला, धोरणांना आणि प्राधान्यांना आकार देतो. त्यामुळे मत देणे हा केवळ अधिकार नसून तो एक सामाजिक कर्तव्य आहे, असे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ठामपणे म्हणता येते. राष्ट्रीय मतदार दिनाची संकल्पना मतदार नोंदणी वाढविणे, मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणे या उद्देशाने राबविली जाते. मात्र लोकशाहीची गुणवत्ता केवळ मतदानाच्या टक्केवारीवर मोजता येत नाही. माहितीपूर्ण, विवेकी आणि जबाबदार मतदान ही खरी लोकशाहीची कसोटी असते. आजच्या काळात माध्यमांचा वाढता प्रभाव, जाहिराती, सोशल मीडिया, भावनिक प्रचार आणि ओळखींचे राजकारण यामुळे मतदाराच्या निर्णयप्रक्रियेवर अनेक प्रकारचे दबाव निर्माण होत आहेत. जेव्हा माहिती अपुरी, एकांगी किंवा चुकीची असते, तेव्हा मतदान भावनांवर आधारित होते आणि लोकशाहीची गुणवत्ता घसरते. मतदान संस्कृती ही कोणत्याही समाजाच्या लोकशाही परिपक्वतेचे प्रतिबिंब असते. मतदान ही केवळ निवडणुकीच्या दिवशी पार पाडायची प्रक्रिया नसून ती दीर्घकाळ घडत जाणारी सामाजिक संस्कारांची प्रक्रिया आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, समाज, माध्यमे आणि सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून मतदानाबाबतची मूल्ये घडत असतात. ज्या समाजात मतभिन्नतेचा सन्मान केला जातो, प्रश्न विचारण्याची मुभा असते आणि विवेकी चर्चेला स्थान असते, त्या समाजात मतदान अधिक सशक्त आणि अर्थपूर्ण ठरते. याउलट ज्या ठिकाणी भीती, दबाव, प्रलोभन किंवा संकुचित ओळखी प्रभावी असतात, तेथे मतदानाची प्रक्रिया मर्यादित होते. महिलांचा मतदानातील सहभाग हा समाजातील लिंग समानतेचा आणि सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा निर्देशांक आहे. स्वातंत्र्यानंतर सार्वत्रिक मताधिकारामुळे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला आणि हळूहळू त्यांच्या सामाजिक भूमिकेत बदल घडू लागला. गेल्या काही दशकांत महिलांच्या मतदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. हा बदल शिक्षण, आर्थिक सहभाग, स्वयं-सहायता गट, स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षण आणि वाढते सामाजिक आत्मभान यांचा परिणाम आहे. तरुण मतदार हा भारतीय लोकशाहीचा भविष्यकाळ आहे. मात्र बेरोजगारी, स्थलांतर, शिक्षणाचा ताण आणि राजकारणाबद्दलची नाराजी यामुळे काही तरुण मतदानापासून दूर राहतात. जेव्हा तरुणांना राजकारणात आपले प्रश्न आणि आकांक्षा प्रतिबिंबित होताना दिसतात, तेव्हा त्यांचा सहभाग वाढतो. राष्ट्रीय मतदार दिन हा तरुणांना माहितीपूर्ण, चिकित्सक आणि सक्रिय मतदार म्हणून घडविण्याची महत्त्वाची संधी आहे. ग्रामीण व शहरी मतदारांच्या वर्तनात काही समाजशास्त्रीय फरक आढळतात. ग्रामीण भागात स्थानिक नेतृत्व, नातेसंबंध आणि जातीय रचना प्रभावी असतात, तर शहरी भागात माध्यमे, विकासाचे मुद्दे आणि रोजगार अधिक प्रभाव टाकतात. तथापि, शिक्षण व तंत्रज्ञानामुळे हे अंतर हळूहळू कमी होत आहे. मतदार शिक्षण व जनजागृती कार्यक्रम लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहेत. प्रभावी मतदार शिक्षण हे केवळ तांत्रिक माहितीपुरते मर्यादित न राहता राज्यघटनेची मूल्ये, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचा प्रचार करणारे असावे. लोकशाहीतील विश्वास हा अत्यंत नाजूक पण महत्त्वाचा घटक आहे. भ्रष्टाचार, अपारदर्शकता आणि नैतिकतेचा अभाव यामुळे हा विश्वास ढासळतो. मतदान न करणे हाही एक सामाजिक संदेश असतो; मात्र ही निष्क्रियता लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. प्रत्येक मतदाराने आपल्या मताचे सामाजिक व राजकीय महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. डिजिटल युगात लोकशाहीसमोर नव्या संधी व आव्हाने उभी आहेत. सोशल मीडियामुळे सहभाग वाढू शकतो, मात्र चुकीची माहिती व धृवीकरणाचे धोकेही वाढले आहेत. म्हणून डिजिटल साक्षरता ही आधुनिक मतदार साक्षरतेचा अविभाज्य भाग ठरते. शेवटी असे म्हणता येईल की राष्ट्रीय मतदार दिन हा भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा उत्सव आहे. मतदार हा केवळ निवडणुकीतील घटक नसून तो समाजपरिवर्तनाचा सक्रिय वाहक आहे. माहितीपूर्ण, नैतिक, जागरूक आणि जबाबदार मतदार घडविणे हीच सशक्त, स्थिर आणि न्याय्य लोकशाहीची खरी हमी आहे. ■ ■







डॉ. राजेंद्र बगाटे
मो. 9960103582





स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -६८

## आदर्श विद्यार्थी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सीतेपार ता.जिल्हा. भंडारा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पंचशील बुद्ध विहार, बुद्धाचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा सीतेपार, जि. भंडारा , सदर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा वरील गावात आहे इथे प्रत्येक दिनविशेष ला विद्यार्थी एकत्र येतात.सहभागातून पुतळ्याची निर्मिती करण्यात आली. भंडारा वरून 12km अंतरावर हे एक छोटंसं गाव आहे.इथे जि. प. प्राथमिक शाळा, आहे. .गावाची लोकसंख्या अंदाजे 400 च्या जवळपास आहे.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
9370773608

## पाच दिवसीय डॉ. मधुकरराव वासनिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप

**नागपूर :** माजी आमदार व पीपल्स वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वरच्या सौजन्याने कळमेश्वर नगरीत क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नगरात डॉ. मधुकरराव वासनिक सद्भावना दौड, आंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा, बौद्धीक ज्ञान स्पर्धा, तसेच रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महोत्सवात विद्यार्थ्यांनी त्यांच्यातील क्रीडा, नृत्य, नाट्यकला गुणांचे सादरीकरण करून मंत्रमुग्ध केले. या वार्षिकोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डा. राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले तर पीपल्स वेल्फेअर सोसायटीचे सहसचिव धर्मेंद्र बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या 91 व्या जयंती निमित्त आज महाविद्यालयाच्या कमलताई वासनिक सभामंच येथे आयोजित बहरदार समारंभात वार्षिकोत्सवाचे बक्षीस वितरण कार्यक्रम कळमेश्वर नगरच्या तहसिलदार ज्योती जाधव, पोलिस उपनिरीक्षक नागरगोजे, संस्थाचे सचिव मनोज वासनिक, सहसचिव धर्मेंद्र बनसोड,



नगरसेविका विशाखा गमे, नायब तहसिलदार सुभेदार संदीप तडसे यांच्या हस्ते, तर प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. मंजुषा ढोबळे, दीपा बीडकर, हर्षा गाणार, निधी गुप्ता, सुकन्या घाटोळे यांच्या द्वारे रचित स्वागत गीतांनी झाली. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. सद्भावना दौड स्पर्धेत पंच म्हणून काम केलेले प्रविण सुके, राजेंद्र खडसे, चांभारे, काळबुधे, विद्यापीठ परिक्षेत वाणिज्य शाखेत गुणवत्ता प्राप्त करणारे विद्यार्थी आशिष खडसे, कोमल पाटील, राज्य स्तरीय कबड्डी स्पर्धेत यशस्वी कामगिरी करणारी महाविद्यालयाची विद्यार्थिनी राखी धुर्वे, विद्यापीठ स्तरीय शरीर सौष्ठवमध्ये यश प्राप्त करणारा करण डोळस यांचा पुष्पगुच्छ तथा स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. क्रिडा महोत्सव यशस्वी करणारे क्रिडा शिक्षक नरेश गायधने यांचा सत्कार केला.

डॉ. मधुकरराव वासनिक यांची आज 91 वी जयंती. त्यानिमित्त महाविद्यालय आवारात निर्माण केलेल्या प्रेरणाभूमी स्मारकाला अतिथींनी दीप प्रज्वलन व पुष्पजंली अर्पित करून अभिवादन केले.

समारोपाला योगचार्य प्रा. अतुल श्रृंगारपवार व प्रा. संजय गजघाटे हे आवर्जुन हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणेश जोत यांनी केले. संचालन मंजूषा कापसे निस्ताने यांनी तर आभार हेमंत बागडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मंजुषा ढोबळे, राजेश घोडेस्वार, राजेश चालीकवार, रोशन भगत, किशोर दुर्गे, दीपा बीडकर, हर्षा गाणार, चेतन ठवरे, महेश देवपारे, सुकन्या घाटोळे, मलिक जावेद, विनोद पटे, मनोज उगले, पंकज ठाकरे, प्रा. संजय रामटेके, सचिन भगत, सुधीर वाघमारे, प्रवीण पाटील, कवडू बागडे, चेतर्ना ,अश्विनी आदि प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## सुप्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडेंना आज श्रद्धांजली

**नागपूर :** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा यांच्यातर्फे श्रद्धांजली सभेचा कार्यक्रम रविवारी 25 दुपारी 2 वाजता स्मृतीशेष कुसुमताई बाबुरावजी झाडे सभागृह नवप्रतिभा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आयुर्वेदिक ले आउट, सक्करदरा, नागपूर येथे श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

नागपूर शहरातील सुप्रसिद्ध आणि गरिबांचे कैवारी असलेले न्यूरो सर्जन डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे आकस्मिक निधन 31 डिसेंबरला झाले होते. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. याप्रसंगी सभेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच विशेष उपस्थिती माजी खासदार रामदास तडस यांची राहतील. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार कृष्णा खोपडे, शेखर सावरबांधे, तेली समाज सभेचे अध्यक्ष नाना ढगे, डॉ. कुणाल पडोळे, डॉ. राजेश सावरबांधे, डॉ. चंद्रशेखर गिल्लुरकर आणि राजेंद्र झाडे यांची उपस्थिती राहतील. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे संयोजक बळवंतराव मोरघडे यांनी कळविले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशनची आज वार्षिक सर्वसाधारण सभा

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, नागपूर यांची सन 2024-25 ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 25 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11 वाजता मिशनच्या सभागृहात आयोजित केली आहे. ही सभा मिशनचे अध्यक्ष शक्तिकांत हुमणे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सभेवेळी आवश्यक गणपूर्ती उपस्थित न राहिल्यास, ठरलेल्या वेळेनंतर उपस्थित सभासदांच्या संख्येनुसार सभा घेण्यात येईल व त्यामध्ये मंजूर झालेले सर्व ठराव सर्व सभासदांवर बंधनकारक राहतील, असे मिशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

या सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचन व कायम करणे, वार्षिक अहवालाचे वाचन व मंजुरी, सन 2024-25 च्या वार्षिक जमा-खर्च (ऑडिट रिपोर्ट) मंजूर करणे, सनदी लेखापालाची नियुक्ती, तसेच मिशनचे 75 वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषयांवरही चर्चा होणार आहे. सभेला येताना वार्षिक अहवाल पुस्तिका सोबत आणणे आवश्यक असून, पत्रव्यवहाराचा पत्ता किंवा दूरध्वनी क्रमांक बदलल्यास संस्थेला कळविण्याचे आवाहन केले आहे. सभेनंतर सभासदांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था केली आहे. ही माहिती मिशनचे सचिव सी. एम. चव्हाण यांनी दिली.

## महत्वाचे

### कवयित्री सुषमा कळमकर अष्टपैलू साहित्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**नागपूर :** सामाजिक कार्यकर्ती कवयित्री लेखिका सुषमा कळमकर यांना अष्टपैलू सांस्कृतिक कला अकॅडमी मुंबई तसेच न्याय प्रभात वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्धमाने अष्टपैलू राज्यस्तरीय साहित्य जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला पुणे (आळंदी ) सुवर्णकार सभागृहातमोठ्या उत्साहात समारंभ पार पाडला. साहित्य क्षेत्रातील प्रदीर्घ सातत्यपूर्ण व गुणवत्ता पूर्ण योगदानाबद्धल सुषमा कळमकर यांना अष्टपैलू साहित्य जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. समूहाचे अध्यक्ष व संपादक शिवाजी खेरे दरमहा काव्य स्पर्धेचे आयोजन करून विविध सामाजिक सांस्कृतिक, अध्यात्मिक विषय देतात. या स्पर्धामध्ये सुषमा प्र. कळमकर यांनी सतत पाच वर्ष सहभाग घेऊन सर्वोत्कृष्ट मानांकन प्राप्त झाले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत शिवाजी खेरे यांनी त्या मानाच्या पुरस्कारासाठी निवड केली. यांना जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ साहित्यिक विश्वगुरू मधुसूदन घाणेकर, तसेच अष्टपैलू अकॅडमी संस्थेचे अध्यक्ष शिवाजी खेरे, ह.भ.प प्रल्हाद सुपेकर महाराज, प्रताप पाटील, न्याय प्रभात वृत्तपत्र अध्यक्ष अनुसया खेरे यांच्या हस्ते साहित्य क्षेत्रातील मानाचा अष्टपैलू राज्यस्तरीय साहित्य जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले.



### संघर्षशील व्यक्तिमत्व क्रांतीजोती सावित्रीबाई फुले - दिलीप येवले

**कोराडी :** स्थानिक मोहपा क्रांतीजोती सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीच्या निमित्ताने बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय मोहपा, येथे महात्मा फुले आणि क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. निबंध स्पर्धेचा पुरस्कार वितरणाचा सोहळा सामाजिक कार्यकर्ते दिलीप येवले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षशील जीवन प्रवासावर आपल्या ओझळत्या वाणीतून विद्यार्थ्यांसमोर उभा केला आणि शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. हा आत्मविश्वास दिलीप येवले यांनी प्रमुख वक्ता म्हणून विद्यार्थीशी संवाद साधला. या स्पर्धेत 21 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. प्रथम पुरस्काराचा मानकरी बी.ए.भाग 1 चा विद्यार्थी, आदित्य पेंदाम तर द्वितीय पुरस्काराची मानकरी एम.ए. समाजशास्त्र, द्वितीय विषयाची विद्यार्थिनी अर्चना नेहारे, यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र देण्यात आले व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि एक पेन देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले प्रा. डॉ. प्रमोद वडते, डॉ. धनंजय देवते, डॉ. संजय ठवळे, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. शुभम वाघ, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव संचालन डॉ. लिलाधर खरपुरीये आभार प्रा. अनिता गणोरकर यांनी मानले.



## म. रा. बालनाट्य स्पर्धेत 'घायाळ पाखरा' बालनाट्यातील अभिनयाच्या सुंदर जुगलबंदीने मुलांची मने केली मोहित

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित 22 वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा, नागपूर केंद्राच्या प्राथमिक फेरीत वनामती, वसंतराव नाईक सभागृह धरमपेठ येथे सकाळी 9.50 वाजता 'घायाळ पाखरा' या वीरेंद्र गणवीर लिखित आणि अस्मिता पाटील दिग्दर्शित मानव रंगभूमी, नागपूर प्रस्तुत 'घायाळ पाखरा' या बालनाट्य एकांकिकेतून एक विकलांग आणि गतिमंद असणाऱ्या भीमा नावाच्या मुलाची शिकण्याची जिद्द नाटकात रेखाटण्यात आली आहे. भीमा आणि त्याची आई एका गावात राहतात त्याचे वडील नसतात. परंतु त्याच्या वडिलांचे स्वप्न असते की माझ्या पोरांनी शिकावे, मोठ व्हावे हे स्वप्न भंगत आणि लहानपणीच भीमा पाळण्यातुन पडून विकलांग आणि गतिमंद होतो. पुढे त्याच्या वडिलांची हत्या होते. आई अशा असाधारण मुलाला दुसऱ्यांच्या शेतात काबाडकष्ट करून शिकविते. परंतु तिच्या मुलाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन काही केला बदलत नाही. अशात इतर मुलांकडून भीमाला सततची मारहाण, अवहेलना पचवावी लागते आणि भीमाचे एकेदिवशी मनोबल खचते तो शाळेत जायला नकार देतो. परंतु संघर्षशील आई त्याच्यात नव्याने उमेद भरत त्याला शिक्षणाचे महत्व पटावून देत उभे करते. अशा या घायाळ पाखराची करुण कथा बालनाट्यात मांडली आहे. बाल नाटकात भीमाच्या भूमिकेत श्लोक पारवे, आई पुण्या लारोकर, बाबल्या प्रिन्स लारोकर, मित्र शरद मसाने व इतर. दिग्दर्शन अस्मिता पाटील, प्रकाशयोजना जुहिल उके, पार्श्वसंगीत ऋषिकेश पोजगे, नेपथ्य साक्षी नायगावकर तर रंगभूषा व वेशभूषा वैभव माकोडे आणि रंगमंचीय व्यवस्था धम्मपाल माटे यांची होती.



## रिपब्लिकन विचार जिवंत ठेवायचा असेल तर निष्ठावान कार्यकर्त्यांनी पुढे यावे - अरुण गाडे

**नागपूर :** रिपब्लिकन विचार जिवंत ठेवायचा असेल तर निष्ठावान कार्यकर्त्यांनी पुढे यावे असे रिपब्लिकन लोकशाही मोर्चाचे मुख्य संयोजक अरुण गाडे यांनी रिपब्लिकन लोकशाही मोर्चा व राष्ट्रीय एकता आंदोलनद्वारा आयोजित नागपूर महापालिका निवडणुकीत झालेला दारुण पराभव व पुढील दिशा याबाबत रवीभावन नागपूर येथे झालेल्या चिंतन सभेत मार्गदर्शन केले.

या प्रसंगी कवी, गायक व आंबेडकरी प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे कार्यक्रमाचे अध्यक्ष, तर भन्ते पय्यासिरी, राष्ट्रीय ओबीसी जनमोर्चाचे प्रा. रमेश पिशे, कामगार नेते, प्रा. मधुकर उईके, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे श्रीकांत धोटे विचारमंचावर उपस्थित होते.

प्रा. रमेश पिशे यांनी रिपब्लिकन लोकशाही मोर्चा हा अनेक पक्ष व सामाजिक संगठनाद्वारा सर्व घटकांना एकत्र आणने या उद्धेशाने स्थापित केला व ज्याप्रमाणे यश मिळाले.



त्यावरून आमचा उद्देश सफल झाला. ॲड. सुरेश घाटे यांनी समाजातील डॉक्टर्स, इंजिनिअरस, साहित्यिक श्रीमंत व प्रतिष्ठीत व्यक्तींनी चळवळ बळकट करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.

प्रा. मधुकर उईके, श्रीकांत धोटे, विशाल सोमकुवर, रोहन राठोड यांची भाषणे झाली. अध्यक्षीय भाषणात अनिरुद्ध शेवाळे यांनी फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार हा बहुजनाच्या कल्याणाचा आहे. रिपब्लिकन लोकशाही मोर्च्याच्या बॅनरखाली आपली राजकीय ताकद उभी करावी. यश निश्चित मिळेल असा अशावाद त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी राजेंद्र मेश्राम रिपब्लिकन सेना, चिंतामणी निमजे, भानुकुमार, राजेश पाटील, सरोज मेश्राम, राजू रत्ने, गौतम सातपुते, संजय रामटेके यांचे सह अनेकांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला बंजारा चवळीतील नामा जाधव, भीम आर्मीचे संजय फुलझेले, रवींद्र डोंगरे, राजेंद्र चौहान, राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे शेषराव गणवीर, रामेश्वर काळबांडे, गौतम पाटील, अरविंद तायडे, संजय गजभिये, राजेश पाटील, रवींद्र डोंगरे, महेंद्र नगरकर, सुभाष हाडके, राहुल कांबळे, डॉ. अनिल नागबौद्ध यांचे सह अनेक आंबेडकरी, ओबीसी आदिवासी बंजारा चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व भूमिका श्यामराव हाडके यांनी तर आभार रवी पोथारे यांनी केले.

## महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे जिल्हा अधिवेशन - नवीन कार्यकारणी गठित

**नागपूर :** सुकेश गुर्वे यांची नागपूर झोन अध्यक्षपदी निवड. अभिजित माहुलकर झोन सचिव योगेश सायवानकर कोषाध्यक्ष, सागर साबळे संघटन मंत्री, मुकेश पाश्रीकर कार्याध्यक्ष या पदावर निवड झाली. महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदुर संघ यांचे नागपूर जिल्हा अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडले. अधिवेशनाची सुरवात प्रतिमांचे पूजन, श्रमिक गीत घोषणांनी करण्यात आली. सर्व मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक सादर केले. या अधिवेशनास उद्घाटकस्थानी राजेश पोफळी झोनल सचिव महाराष्ट्र वीज कामगार महासंघ व तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव पहाडे महामंत्री सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक संघ महाराष्ट्र प्रदेश व या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते निलेश खरात प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ हे लाभले, अधिवेशनात संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश खरात यांनी मार्गदर्शन करतांना कंत्राटी कामगारांना नोकरी स्थैर्य कंत्राटदार विरहित रोजगार व समान काम समान वेतन मिळावे, यासाठी आग्रही असल्याचे स्पष्ट केले.



जिल्ह्यातील संघटनात्मक स्थिती सदस्य नोंदणी व वर्गणी सुरू असलेली न्यायालयीन प्रकरणे तसेच दैनंदिन बाबत काटेकोर व पारदर्शक अंमलबजावणी करण्याचा ठाम निर्णय अधिवेशनात एकमताने घेतला. भारतीय मजूर संघाच्या विचारधारेनुसार संघटन संघर्ष व संवाद या मार्गाने कामगारांचे प्रश्न सोडवले जातील असा विश्वास व्यक्त केला. अधिवेशनाच्या प्रसंगी सुकेश गुर्वे, अभिजीत माहुलकर, सागर साबळे, योगेश सावकर, मुरलीधर मांजरेकर, मुकेश पात्रीकर, अमोल धोटे, ज्ञानेश्वर कुडके, जावेद खान, गोपाल कुरील, सौरभ वैरागडे, हेमंत भांडारकर, सौरभ गायकवाड, सुनील जिचकार, यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या अधिवेशनास 300 पेक्षा अधिक कंत्राटी वीज कामगारांची उपस्थिती यावेळी होती.

## कमलापूर येथे रोगनिदान शिबिर यशस्वी - 514 रूग्णांची मोफत तपासणी

**गडचिरोली :** अहेरी तालुक्यातील कमलापूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्थापित श्रीगुरुदेव आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेच्या प्रांगणात भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षापासून थोर समाजसेवी व्यक्तिमत्व आणि राष्ट्रसंताचे अनुयायी डॉ. शिवनाथ कुंभारे यांच्या प्रेरणेने जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात रोगनिदान शिबिराचे करण्यात येत असते. सदर शिबिर धन्वंतरी हास्पिटल अँड मल्टीस्पेशालिटी सेंटर, गडचिरोली आणि माधव नेत्रालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने झाले आणि यात एकूण 514 रूग्णांची मोफत वैद्यकीय तपासणी तसेच औषधोपचार करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी दलित मित्र नाना वाढई, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जिल्हा सेवाधिकारी अरविंद पाटील वासेकर, डॉ. अंनता कुंभारे, प्रचार प्रमुख पंडित पुडके, कमलापूरच्या सरपंच रंजिता मडावी, राणी कुंभारे तसेच जिल्ह्यातील बहुतेक श्री गुरुदेव सेवक प्रचारक आदी उपस्थित होते. या महा आरोग्य शिबिरात नेत्र तपासणी, एक्सरे, अस्थिरोग, बालरोग, दमा अस्थमा, दंतरोग, स्त्री रोग आदी सर्व प्रकारच्या रूग्णांची मोफत वैद्यकीय तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. तसेच मोफत चष्मे वाटप करण्यात आले आणि सर्व रूग्णांची रक्तदाब व रक्त तपासणी करण्यात आली. गडचिरोली येथील धन्वंतरी हास्पिटलचे संचालक तथा क्ष किरण तज्ञ डॉ. अनंता कुंभारे, शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. यशवंत दुर्गे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. रोहन कुमरे, हृदय रोग तज्ञ डॉ. राकेश चहांदे, बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत चलाख, डॉ. निखिल चव्हाण, डॉ. मुकेश आतालगडे, डेंटल सर्जन डॉ. प्रफुल्ल वाळ्के, डॉ. उमेश समर्थ, स्त्री रोग तज्ञ खुशबू दुर्गे, डॉ. मयुर दुधबळे, क्षयरोग तज्ज्ञ डॉ. सचिन हेमके, डॉ. किशोर वैद्य, डॉ. रूपाली पाटील, हरिश दांडेकर, सचिन येनप्रेडीवार, अमित संगिडवार, मनिष गुड्डेवार आदींनी उत्स्फूर्तपणे सेवा दिली. एवढ्या मोठ्या प्रमाणात रोगनिदान शिबिराचे आयोजन केल्याबद्दल परिसरातील आदिवासी समाज बंधूंनी श्रीगुरुदेव व्यायाम व शिक्षण सेवा प्रसारक मंडळाचे कौतुक करून धन्यवाद दिले. सदर मंडळाच्या वतीने शिबिराच्या निमित्ताने आश्रम शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना वाटर बाटल आणि मच्छरदाणी भेट स्वरूपात देण्यात आले.सायंकाळी सामुदायिक प्रार्थना करून शिबिराची सांगता करण्यात आली. शिबिराचे निमित्ताने आलेल्या जिल्ह्यातील नामवंत डॉक्टर मंडळीनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 1958 साली स्थापन केलेल्या सामुदायिक प्रार्थना मंदिराचे व श्री गुरुदेव कुटीचे दर्शन घेत आपले जीवन कृतार्थ झाल्याची भावना व्यक्त केली.

## 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' - छोट्या सावित्रीची जादू! तक्षा शेट्टीच्या अभिनयाने जिंकली प्रेक्षकांची मने

**मुंबई :** स्टार प्रवाह वाहिनीवर 5 जानेवारी 2026 पासून सुरू झालेली 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. विशेष म्हणजे, या मालिकेतील सावित्रीबाईंच्या बालपणीची भूमिका साकारणारी बालकलाकार तक्षा शेट्टी हिच्या अभिनयाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. छोट्या सावित्रीचा प्रभावी अभिनय मालिकेच्या सुरुवातीच्या पर्वात सावित्रीबाईंचे बालपण, त्यांची शिक्षणाबद्दलची ओढ आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची वृत्ती दाखवण्यात आली आहे. ही भूमिका तक्षा शेट्टीने अत्यंत ताकदीने पेलली आहे. तिथे बोलके डोळे आणि संवादफेकीमुळे प्रेक्षक या भूमिकेशी एकरूप झाले आहेत. 'एबीपी माझा'च्या वृत्तानुसार, तक्षाने साकारलेली सावित्री केवळ अभिनय वाटत नाही, तर ती त्या भूमिकेत पूर्णपणे शिरली असल्याचे जाणवते. मधुराणी गोखले यांच्याकडून कौतुक या मालिकेत मोठ्या सावित्रीबाईंची भूमिका प्रसिद्ध अभिनेत्री मधुराणी गोखले-प्रभुलकर साकारत आहेत. त्यांनीही तक्षाच्या कामाचे भरभरून कौतुक केले आहे. त्या म्हणाल्या, 'तक्षाला पाहताना मला माझ्याच बालपणाची आठवण येते. इतक्या लहान वयात तिची समज आणि मेहनत वाखाणण्याजोगी आहे.'



मालिकेची भव्यता या ऐतिहासिक मालिकेची निर्मिती आणि महात्मा जोतीराव फुलेंची भूमिका खासदार आणि अभिनेते डॉ. अमोल कोल्हे करत आहेत. 'साम टीव्ही' आणि महाराष्ट्र टाइम्सच्या रिपोर्ट्सनुसार, या मालिकेचा उद्देश केवळ मनोरंजन नसून, सावित्रीबाईंचा संघर्ष आणि त्यांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा आहे. मालिका दररोज सायंकाळी 7.30 वाजता प्रसारित होत आहे.

प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादामुळे ही मालिका टीआरपी शर्यतीतही आघाडीवर राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## चित्रपट तयार करत रहा, यश मिळेल

### दिग्दर्शक डॅन वॉलमन यांचा नव्या दिग्दर्शकांना सल्ला

प्रवीण गांगुर्डे,

**पुणे :** चित्रपट तयार करण्याचे काम कायम करत रहा, थांबू नका, यश मिळेल, असा सल्ला आज इस्त्रायलचे दिग्दर्शक डॅन वॉलमन यांनी नव्या स्वतंत्र दिग्दर्शकांना दिला.

पुणे चित्रपट महोत्सवा(पिफ)त आज 'कमी संसाधनांतून सर्जनशीलतेकडे - नव्या स्वतंत्र दिग्दर्शकांना सल्ला', या विषयावर डॅन वॉलमन बोलत होते. यावेळी महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल उपस्थित होते.

डॅन वॉलमन म्हणाले, 'कायम करत रहा आणि चित्रपट तयार करत रहा. आपल्याला हवी तशी परिस्थिती तयार होईल, तेंव्हा चित्रपट तयार करू, असा विचार करत बसू नका. कमी खर्चाच्या कथा निवडा. कथा अशीच निवडा की ज्याच्यामध्ये लोकेशन आणि अभिनेत्यांवर जास्त खर्च होणार नाही आणि चित्रपट करण्यापूर्वी कालावधीचा विचार करा.' ते म्हणाले, 'जगामध्ये युद्ध, हिंसा, द्वेष सुरू आहेत आणि त्यामुळे निराशा येऊ शकते. मला मात्र त्यातून निराश न होता जिवंत ठेवण्यासाठी सतत चित्रपट तयार करणे, गरजेचे असते.'

ज्यांच्याकडे संसाधनांची कमी आहे, पण ज्यांना चित्रपट तयार करायचे आहेत, त्यांच्यासाठी बायबलमधील




दोन शिकाऱ्यांचे उदाहरण देत ते म्हणाले, 'थांबू नका. कमी लोकांमध्ये काम करा. मी सहाय्यक ठेवत नाही. त्यामुळे काम जलद होते आणि खर्च कमी होतो. मी प्रसिद्ध नटांपेक्षा चांगले अभिनेते घेतो.'

ते म्हणाले, की ते न्युयॉर्कमध्ये 1960 च्या दशकात फिल्म मेकिंग शिकले, तेंव्हा अंडरग्राउंड फिल्म चळवळ सुरू होती. स्वतंत्र चित्रपट दिग्दर्शकांनी न्यूयॉर्कच्या अंडरग्राउंड फिल्म चळवळीसारखे प्रयत्न केले पाहिजेत. त्यातून मोठ्या चित्रपटगृहात चित्रपट दाखवण्यापेक्षा छोट्या छोट्या ठिकाणी चित्रपट दाखवता येतील.

एआयबद्दलच्या एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, की एआयचा वापर कसा करावा याचा विचार करावा लागेल. त्याचा सर्रास वापर करण्यामध्ये खूप तोटे आहेत. चित्रपटात एआयचा वापर केल्याने माणसांना मिळणारा प्रत्यक्ष अनुभव कमी होतो.

## महापुरुषांच्या आदर्शातून विद्यार्थ्यांनी समाजसेवेचा वसा घ्यावा - डॉ. लीना निकम

**उमरेड :** नूतन आदर्श कला, वाणिज्य व म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने आयोजित विशेष शिबिराचा उद्घाटन समारंभ नवेगाव साधू येथे मंगळवार, दि. 20 सप्टेंबर 2026 रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अर्चना चौधरी होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध लेखिका डॉ. लीना निकम, नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थितीत महेश तवले, संस्कृत अभ्यास मंडळ, रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. विनयकुमार उपाध्याय, आय क्यू ए सी समन्वयक डॉ. संजीव कोंडेकर, मराठी विभाग प्रमुख प्रा. विनोद मांडवकर, इतिहास विभाग प्रमुख प्रा. मनोज नगरकर, डॉ. गजानन बाबडे व डॉ. मोनाली बहादूरे यांची उपस्थिती लाभली.

यावेळी ग्रामपंचायत नवगाव (साधू) येथील सरपंच योगिता राजू वैद्य, उपसरपंच प्रकाश धांडे, ग्रामविकास अधिकारी विजय टोनपे, शेषराव मुनघाटे, राहुल नागेकर तसेच इतर उपस्थित होते.




सुप्रसिद्ध लेखिका डॉ. लीना निकम यांनी त्यांचा उद्घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीमाई फुले यासारख्या महापुरुषांच्या आदर्शातून समाजसेवेचा वसा घ्यावा असा संदेश दिला. ग्रामीण भागात घरोघरी जाऊन त्यांना डिजिटल लिटरसी बाबत मदत करणे गरजेचे आहे. परिस्थिती अनुकूल नसताना काही मावळ्यांना सोबत घेऊन शिवाजी महाराजांनी पहिले स्टार्टअप सुरू केले त्याचे नाव आहे हिंदवी स्वराज्य. इतिहास आपण वाचायला हवा. तो आपल्याला प्रेरणा देतो आणि आयुष्याला दिशा देतो. गुटखा, तंबाखू, दारू सारखे कुठलेही वाईट व्यसन करू नका. यामुळे सुंदर आयुष्य नासवल्या जाते. मित्रांनाही सांगा. गुटखा खाऊन तोंड बंद करू नका तर अन्यायाविरुद्ध तोंड उघडे ठेवा असाही मोलाचा संदेश त्यांनी दिला.

डॉ. विनयकुमार उपाध्याय यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेचा उद्देश, युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, शिस्त, स्वयंसेवा आणि राष्ट्रनिर्मितीचे संस्कार रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात डॉ. अर्चना चौधरी यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव व नैतिक मूल्यांचा विकास होतो, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन अर्पिता पुंड व उर्मिला राऊत व आभार प्रदर्शन विवेक मेश्राम यांनी केले.

उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. लोमेश बावनकुळे, सह कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपेश खुबाळकर, पथ प्रमुख मिहीर भेदे व उप पथप्रमुख प्राची शेंदरे यांनी अथक परिश्रम घेतले.




बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648